## नि.दि.दा. क्र. 59/2011 मधील नि.क्र. 75 वरील आदेश

1. वादपत्रात दुरुस्ती करुन मिळण्याची वादीने या अर्जात विनंती केली आहे. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जास खुलासा दाखल करुन हरकत घेतलेली आहे.

2. वादीच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, वादपत्रातील परि. क्र. 1 मध्ये दावा मिळकतीचे वर्णन करतेवेळी सर्वे कं. 301 यातील पोटहिस्सा कं. 2 बाबत नमुद करण्यात आलेले आहे. परंतू, सदर जमिनीचा उल्लेख वादपत्रातील विनंती परि. कं. 3 मध्ये नजरचुकीने व अनावधानाने नमुद करावयाचे राहून गेले आहे. मौजे बिटरगांव येथील नविन सर्वे कं. 301 यातील पोटहिस्सा कं. 2 क्षेत्र 1 हेक्टर 60 आर ही जमिन देखील दावा मिळकत असल्याचे संपूर्ण वादपत्रावरून स्पष्ट होते. तरी, सदर मिळकतीचा उल्लेख वादपत्रातील विनंती परि. कं. 3 करण्याची परवानगी दिल्यास प्रतिवादींचे कोणतेही नूकसान होणार नाही.

3 प्रतिवादींच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, दावा मिळकत नसलेल्या जमिनीचा उल्लेख वादपत्रामध्ये केल्यास दाव्याच्या मूळ स्वरूपात पूर्णपणे बदल होईल. प्रतिवादींनी त्यांचा लेखी खूलासा दाखल केलेला आहे व प्रकरण पुराव्यासाठी नेमलेले आहे. त्यामुळे, प्रस्तुत अर्ज नामंजुर करण्यात यावा.

4. अर्ज व खुलासा वाचला. अभिलेखाचे अवलोकन केले. वादपत्रातील परि. कं 1 ची पाहणी केली असता असे दिसून येते की, मौजे बिटरगांव येथील नविन शेत सर्वे कं. 301 यातील एकूण तीन पोट हिस्यांचा उल्लेख त्यात करण्यात आलेला आहे व सदर जमिनी ह्या प्रस्तूत प्रकरणातील दावा मिळकती आहेत. वादपत्रातील विनंती परि. कं 1 मध्ये देखील नविन सर्वे कं. 301 च्या एकूण क्षेत्रफळाच्या मालकी घोषीत होउन मिळण्याची वादीनी विनंती केली आहे. तसेच, वादपत्रातील विनंती परि. कं. 3 मध्ये देखील वादीने दावा मिळकतीच्या ताब्याची मागणी केली आहे. सदर परिच्छेद कमांक 3 मध्ये नवीन सर्व्हे कमांक 301 च्या एकुण क्षेत्रफळ 3 हे. 86 आर चा उल्लेख करण्यात आलेला आहे. परंतु, त्यात पोटहिस्सा कमांक 2 चा 1 हे 60 आर चा वेगळा उल्लेख दिसुन येत नाही. वादपत्रातिल कथन व दावा मिळकतीचे वर्णन एकत्रीतपणे विचारात घेतले असता विनंती परिच्छेद कमांक 3 मधिल सदर चुक अनावधाने व टंकलेखनाच्या चुकीने झाल्याचे दिसुन येते. त्यामुळे सदर चुक ही दुरूस्त करण्याजोगी असुन तशी परवानगी वादीला दिल्यास दाव्याच्या मुळ स्वरूपात बदल होणार नाही. सदर दुरूस्ती बाबत प्रतिवादींना लेखी जबाबात अनुशंघीक दुरूस्ती करण्याची संधी असल्याने प्रतिवादींचे नुकसान होणार नाही. त्यामुळे तशी वादपत्रात दुरुस्ती करण्याची परवानगी वादीला देणे योग्य व न्यायोचीत ठरते. प्रस्तुत प्रकरणामध्ये वादमुद्दे काढलेले असुन वादीने त्याचे पुराव्याचे शपथपत्र देखील दाखल केलेले आहे. परंतु, सदर शपथपत्रावर अद्याप उलटतपास झालेला नाही. त्यामुळे, प्रकरणाच्या या टप्प्यात प्रस्तुत अर्ज मान्य झाल्यास दाव्याचे

मुळ स्वरुप पुर्णपणे बदलणार नाही. तसेच, प्रस्तुत अर्ज मंजुर होण्यास दिवाणी प्रक्रिया संहिताचे ऑर्डर 6 नियम 17 मधील परंतुकाची देखील बाधा येत नाही. करीता, प्रस्तुत अर्ज मंजुर होण्यास पात्र ठरतो. अंततः, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :–

**आदेश**

1. प्रस्तुतचा अर्ज (नि.क्र. 75) हा मंजुर करण्यात येतो.
2. दिवाणी प्रक्रिया संहिताचे ऑर्डर 6 नियम 17 अन्वये या अर्जातील सुचविलेल्या दुरुस्त्या वादपत्रात करण्यास वादीला परवानगी देण्यात येते.
3. वादीने येणे प्रमाणे वादपत्रामध्ये आज पासून चौदा दिवसांच्या आत सदर दुरुस्त्या करुन दुरुस्त वादपत्र आवश्यक त्या प्रतींसह मुदतीमध्ये सादर करावे.

स्वा/–
(सचिन श्री. तट)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
उमरखेड.

दिनांक : 25/06/2019